# नियम व अटी

# येस बँकेच्या प्रीपेड जीपीआर कार्डांकरिता

येथे नमूद केलेले नियम व अटी (यापुढे " नियम व अटी " म्हणून संदर्भित केलेल्या ) "प्रीपेड जीपीआर कार्ड" च्या वापरासाठी लागू आहेत, आणि त्यांना त्यांचा वापर करण्यापूर्वी मान्य करणे व स्वीकारणे आवश्यक आहे. खाली नमूद केलेल्या आणि येस बँकेने त्यांच्या अखत्यारीत वेळोवेळी सुधारीत केलेल्या नियम व अटी या "प्रीपेड जीपीआर कार्ड" च्या संबंधात आपण आणि येस बँक यांच्यातील संपूर्ण करार आणि / किंवा होणा-या व्यवस्थेच्या अंग असतील. जीपीआर

"प्रीपेड जीपीआर कार्ड" घेण्यासाठीची साइन-अप प्रक्रिया पूर्ण केल्यावर, आपण येथे उल्लेख केलेला प्रत्येक नियम व अट आपण स्पष्टरित्या वाचली, समजली आणि स्वीकारल्याचे मानले जाते.आपण हे मान्य करीत आहात की येस बँकेने त्यांच्या अखत्यारीत वेळोवेळी सुधारीत केलेल्या आणि येथे उल्लेख केलेले सर्व नियम व अटी आपल्यास बंधनकारक आहेत.

## १. व्याख्या

या अटी आणि नियमांमध्ये, जोपर्यंत विपरीत उद्दीष्ट दिसून येत नाही आणि / किंवा अन्य संदर्भास आवश्यक नसेल तर मोठ्या अक्षरात दिलेल्या अटींचा अर्थ : (i) कोटेशन मध्ये आणि / किंवा कोष्टका मध्ये समाविष्ट असलेल्या सारख्या अर्थाच्या आणि (ii) खालील दिलेल्या अटींचा नियुक्त अर्थ खालीलप्रमाणे समजावा:

ए) "खाते " किंवा "कार्ड खाते " म्हणजे प्रीपेड खाते ज्यामधील जमा रक्कम हि पीपीआयवर उपलब्ध असलेल्या मर्यादेवर देखरेख करण्यासाठी पीपीआयवर लोड केलेल्या रकमेएवढी असेल.

बी) "अर्जाचा फॉर्म" चा अर्थ म्हणजे संदर्भ किंवा परवानगी आवश्यक असेल, तर असा कि ग्राहकाने येस बँकेचे प्रीपेड जीपीआर कार्ड घेण्यासाठी किंवा अर्ज करण्यासाठी सर्व आवश्यक माहिती, तपशील, स्पष्टीकरण आणि घोषणा भरून दिलेला प्रीपेड जीपीआर कार्ड संबंधित अर्ज होय.

सी) "धंद्याचा दिवस" म्हणजे रविवार किंवा सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त एक दिवस म्हणजे निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट, १८८१ च्या कलम २५ अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे, बँकांनी बँकिंगचे व्यवहार चालू ठेवण्यासाठीचा दिवस होय.

डी) "शुल्क" म्हणजे वेळोवेळी सुधारीत केलेल्या, प्रीपेड जीपीआर कार्डचा वापर करण्यासाठी येस बँकेद्वारे आकारले जाणारे कोणतेही आकार, खर्च आणि शुल्क.

इ) "ग्राहक" किंवा "धारक" याचा अर्थ कोणतीही व्यक्ती, मर्यादित दायित्व भागीदारी फर्म, भागीदारी, समाज, कंपनी किंवा लागू असलेल्या कायद्यानुसार कोणत्याही अन्य संस्था किंवा तत्सम जे बँकांकडून पीपीआय विकत घेतात / खरेदी करतात आणि त्याचा उपयोग माल व सेवा ज्यामध्ये वित्तीय सेवा, रेमिटन्स सुविधा इ. समाविष्ट असतील अशा प्रकारच्या साधनांवर साठवलेल्या मूल्याच्या खरेदीसाठी करतात.

एफ) "ग्राहक सेवा केंद्र" म्हणजे ग्राहकांच्या कडून आलेल्या सर्व विचारणा, तक्रारी, किंवा प्रीपेड जीपीआर कार्डशी संबंधित ग्राहकाने मागितलेली कोणतीही माहिती किंवा तपशिलासाठी येस बँके द्वारा प्रदान केलेली प्रोग्राम फोन बँकिंग सेवा.

जी) "कार्ड करार" म्हणजे येस बँकेने त्यांच्या कर्मचारी / कंत्राटी कर्मचा-यांना प्रीपेड जीपीआर कार्ड जारी करण्यासाठी वेळोवेळी केलेल्या सुधारणांप्रमाणे ग्राहकाने स्वाक्षरी केलेला आणि अंमलात आणलेला करार किंवा व्यवस्था पत्र.

एच) "कार्ड" किंवा "येस बँके गिफ्ट कार्ड" किंवा प्रीपेड इन्स्ट्रुमेंट (पीपीआय) म्हणजे प्रीपेड इन्स्ट्रुमेंट ("पीपीआय"- कार्ड / वॉलेट) म्हणजे देय देणारी इन्स्ट्रुमेंट असून त्यात वित्तीय सेवा, रेमिटन्स सुविधा इ. माल आणि सेवांची खरेदी

करण्याची सोय डिसेंबर २९, २०१७ रोजीच्या प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स जारी करणे आणि ऑपरेशन्सवर मास्टर दिशानिर्देशामध्ये नमूद केल्यानुसार अशा इन्स्ट्रुमेंट्सवर साठवलेल्या मुल्याकरिता करता येईल.

आय) "ईडीसी" किंवा "इलेक्ट्रॉनिक डेटा कॅप्चर" म्हणजे टर्मिनल, प्रिंटर, इतर परिधीय आणि सुटे भाग आणि आवश्यक सॉफ्टवेअर ज्यावर प्रीपेड जीपीआरकार्ड स्वाइप केले जाऊ शकते किंवा व्यवहार सुरू करण्यासाठी वापरले जाऊ शकते.

जे) "इंटरनेट पेमेंट गेटवे" म्हणजे येस बँकेने निर्धारित केलेला / करू घातलेला असा शिष्टाचार ज्यानुसार ग्राहकाची खातरजमा इंटरनेट द्वारे केल्यावर देयके प्रीपेड जीपीआर कार्ड मार्फत अधिकृत केली जातात.

के) "केवायसी" म्हणजे वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे दिली गेलेली मार्गदर्शक तत्त्वे, परिपत्रके आणि अधिसूचना यानुसार ग्राहकाची ओळख आणि पडताळणीच्या उद्देशाने बँकेने अवलंबिलेली मार्गदर्शक तत्त्वे होय.

एल) "व्यापारी आस्थापना" याचा अर्थ म्हणजे भारतातील स्टोअर, दुकाने, रेस्टॉरंट्स, हॉटेल्स यांचा समावेश असलेली पण त्यांपुरतीच मर्यादित नसलेली अशा भौतिक आस्थापना ज्या ठिकाणी प्रीपेड जीपीआर कार्ड किंवा मास्टर कार्ड स्वीकारली जातात.

एम) "वैयक्तिक ओळख क्रमांक” (पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर ) (पिन) हा अंकीय पासवर्ड आहे जो पीपीआय सोबत ग्राहकांना येस बँकेद्वारे प्रदान केलेल्या किटचा एक भाग आहे.

एन) "रक्कम देण्याचा मार्ग" याचा अर्थ, ईडीसी / पीओएस टर्मिनल / कियोस्क / इंटरनेट पेमेंट गेटवे यांचा समावेश असलेले पण त्यांची मर्यादा नसलेले वेळोवेळी येस बँकेने कळविण्यात आलेले व्यवहारांचे विविध प्रकार होय.

ओ) "पीओएस" ( पॉइंट ऑफ सेल ) "विक्री केंद्र " म्हणजे भारतामध्ये व्यापारी आस्थापने द्वारे ठेवलेले इलेक्ट्रॉनिक टर्मिनल्स ज्यामध्ये ग्राहक वितीय सेवा, रेमिटन्स सुविधा इ.चा समावेश असलेल्या वस्तू व सेवा खरेदी करण्याच्या उद्देशाने प्रीपेड जीपीआर कार्ड वापरू शकतात.

पी) "कार्यक्रम" चा अर्थ ग्राहकांना प्रीपेड जीपीआर कार्ड प्रदान करण्यासाठीचा येस बँकेचा कार्यक्रम होय.

क्यू) "फी / शुल्काची अनुसूची" याचा अर्थ, येस बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेली फी किंवा शुल्काचा तपशील जो वेळोवेळी त्यांच्या वेबसाईट वर दाखविण्यात येईल.

आर) "ताळेबंद" म्हणजे प्रीपेड जीपीआर कार्ड व्यवहारांचे येस बँकेच्या नोंदींमध्ये उपलब्ध असलेले मासिक ताळेबंद ज्यामध्ये प्रीपेड जीपीआर कार्ड द्वारे केले गेलेले आर्थिक व्यवहार किंवा देवाणघेवाणीची तसेच कार्ड अकाऊंटमध्ये काही शिल्लक असल्यास त्याची नोंद असेलेला

एस) "व्यवहार" म्हणजे ग्राहकाद्वारे प्रीपेड जीपीआर कार्ड वर कोणत्याही मास्टरकार्ड संलग्न व्यापारी आस्थापना, येस बँक एटीएम, भारतातील अन्य बँकांच्या एटीएम किंवा इंटरनेटवर सुरु होणारे व्यवहार.

टी) "व्यवहार मर्यादा" चा अर्थ ग्राहकाने खरेदी करण्याची कमाल मर्यादा जी पर्यंत ते कुठल्याही व्यापारी आस्थापनातून किंवा इंटरनेटच्या माध्यमातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या दिलेल्या दिवशी किंवा येस बँकेने

वेळोवेळी निर्धारित केलेल्या काळा मध्ये प्रीपेड जीपीआर कार्ड वापरून खरेदी करू शकतो ती रक्कम,पण कुठल्याही परिस्थितीत हि रक्कम ग्राहकाच्या प्रीपेड जीपीआर कार्ड खात्यातील हस्तांतरित रकमेतून सरासरी खर्च वजा जाता उरणाऱ्या रकमेपेक्षा जास्त नसावी.

यु) "संकेतस्थळ" याचा अर्थ असा की URL www.yesbank.in येथे असलेल्या या संकेतस्थळाची मालकी, स्थापना आणि देखरेख येस बँकेने त्यात वेळोवेळी कोणतेही फेरबदल किंवा सुधारणा केलेल्या सहीत येस बँकेची आहे.

व्ही) "येस बँक" म्हणजे येस बँक मर्यादित, कंपनी अधिनियम १९५६ च्या अंतर्गत असलेली एक बँकिंग कंपनी आणि बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या कलम ५ (सी) च्या अर्थानुसार असलेली एक बँकिंग कंपनी जिचे नोंदणीकृत कार्यालय इंडियाबुल्स फाइनेंस सेंटर 2, 15 वीं मंजिल, एस बी रोड, एलफिंस्टन, मुंबई 400 013 इथे आहे.

## २. लावलेले अर्थ

या अटी आणि नियमांमध्ये, विरूद्ध उद्दिष्ट दिलेले नसल्यास:

अ) "दुरुस्त्या" संदर्भात एक परिशिष्ट, फेरबदल, नवविचार, पुनर्स्थापनेसाठी किंवा पुनर्विचार आणि "सुधारित" हे त्याप्रमाणेच अर्थ लावावे लागतात;

ब) एखाद्या "अधिकृतता" किंवा "मंजूरी" मध्ये अधिकृतता, संमती, मंजूरी, हिरवा कंदिल, परवानगी, ठराव, परवाना, मुक्ती, फाइलिंग आणि नोंदणी यांचा समावेश आहे.

सी) "कायद्या" मध्ये कोणत्याही संविधान, नियम, कायदा, नियम, नियमन, अध्यादेश, निर्णय, आदेश, हुकुम, अधिकृतता किंवा कोणताही प्रकाशित निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे, आवश्यकता किंवा कायद्याचे ताकद असलेले सरकारी बंधन किंवा कोणत्याही प्रकारचे निर्धारण किंवा व्याख्या कोणत्याही न्यायाधीशा संदर्भातील पूर्वपरवानगीबाबत, जरी लागू होण्याची तारीख किंवा त्यानंतर अर्ज सादर केल्यानंतर किंवा त्यानंतर वेळोवेळी दुरुस्त केलेल्या प्रमाणे होय.

डी) "दैवी आपत्ती" म्हणजे कुठल्याही कारणामुळे, कोणत्याही कारणास्तव, येस बँकेच्या शक्य नियंत्रणाबाहेर, कोणत्याही मर्यादा नसलेल्या, कोणत्याही संचार यंत्रणेची उपलब्धता नसणे,विश्वासघात किंवा प्रक्रियेत,देयकामध्ये,वितरण यंत्रणेत व्हायरस घुसणे,घातपात,आग लागणे,पूर,स्फोट,दैवी कृत्य,नागरी खोडकरपणा,बंद किंवा कोणत्याही प्रकारचे औद्योगिक कृती,दंगे, उठाव,युध्द, शासनाची कारवाई, संगणक हॅकिंग, संगणक डेटा आणि स्टोरेज डिव्हाइसेसवर अनधिकृत प्रवेश,संगणक बंद पडणे, संगणक टर्मिनलमध्ये अकार्यक्षम होणे किंवा दुर्भावनापूर्ण, विध्वंसक किंवा भ्रष्ट कोड किंवा प्रोग्राम, यांत्रिक किंवा तांत्रिक त्रुटी / अपयश किंवा पॉवर शट डाउन, दूरसंचारातील दोष किंवा बंद पडणे.

ई) एक वचनीपणा मध्ये बहुवचन आणि उलट;

एफ) या अटी आणि नियमांचे शीर्षक केवळ संदर्भ सोयीसाठी समाविष्ट केले आहेत.

जी) "समावेश" किंवा "समावेश" या शब्दांचा संदर्भ मर्यादेशिवाय लावण्यात येईल;

एच) लिंगाच्या संदर्भा मध्ये स्त्री, पुरुष आणि तृतीय पंथीय लिंगांच्या संदर्भाचा समावेश असेल.

आय) कुठल्याही बाबीसाठी येस बँकेला आवश्यक त्या सर्व मंजुरी, परवानगी, संमती किंवा स्वीकृती करिता येस बँकेची लेखी मंजुरी, परवानगी, संमती किंवा स्वीकृती घेणे आवश्यक आहे;

जे) येस बँक आणि ग्राहक यांच्यात कोणतेही मतभेद किंवा वादविवाद झाल्यास कोणतीही घटना, प्रसंग, परिस्थिती, बदल, वस्तुस्थिती, माहिती, कागदपत्रे, प्राधिकृत करणे, कार्यवाही, कार्यवाही, वगळणे, दावे, उल्लंघन, हलगर्जीपणा किंवा अन्यथा कोणतीही प्रकरणाची भौगोलिक स्थिती म्हणून येस बँकेचे मत ग्राहकास अंतिम आणि बंधनकारक असेल.

# 3. नियम व अटींची लागू करण्याची क्षमता

ए) हे सर्व नियम व अटी, सर्वसाधारण नियम व अटी यांच्या सोबत प्रीपेड जीपीआर कार्ड च्या वापरासाठी ग्राहक आणि येस बँक यांच्यात संपूर्ण करार तयार करतात.

बी) येस बँकेद्वारे वेळोवेळी ठरवलेल्या पात्रतेच्या निकषांची पूर्तता करू शकणाऱ्या ग्राहकास प्रीपेड जीपीआर कार्ड येस बँके कडून दिले जाईल.

सी) प्रीपेड जीपीआर कार्ड इतर व्यक्ती किंवा पार्टीकडे हस्तांतरणीय असणार नाही.

ड) प्रीपेड जीपीआर कार्ड वर अपलोड करता येणारी कमाल क्रेडिट शिल्लक मर्यादा रु. १०,००० / - (दहा हजार फक्त) असेल.

ई) प्रीपेड जीपीआर कार्ड फक्त भारताच्या प्रांतामध्ये आणि भारतीय रुपयांमधील व्यवहारांसाठीच वैध राहील. जीपीआर कार्ड भारताच्या क्षेत्राच्या बाहेर किंवा परकीय चलनात असलेल्या कोणत्याही व्यवहारासाठी वापरले जाऊ शकत नाही.

एफ) प्रीपेड जीपीआर कार्ड ही येस बँकेची विशेष मालमत्ता आहे.

जी) ग्राहकाच्या प्रीपेड जीपीआर कार्ड प्राप्ती नंतर त्याने ताबडतोब कार्डच्या उलट बाजूस सही करणे आवश्यक आहे. ग्राहकाला कोणतीही सूचना न देता किंवा न कळविता, सही नसल्यास किंवा सही जुळत नसल्यास कोणतेही व्यवहार नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

एच) उर्वरीत जमा रकमेच्या चौकशी व्यवहारांसाठी ऑटोमेटेड टेलर मशीन्स ("एटीएम") येथे प्रीपेड जीपीआर कार्डचा वापर केला जाऊ शकतो.

आय) कोणत्याही वेळी प्रीपेड जीपीआर कार्ड मध्ये ठेवलेल्या कोणत्याही शिल्लक रकमेवर व्याज अदा करण्यासाठी येस बँक जबाबदार असणार नाही.

जे) येस बँक ग्राहकाच्या प्रीपेड जीपीआर कार्डची मुदत संपण्या आधी ४५ दिवस ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे माहिती देईल किंवा कळवेल. प्रीपेड जीपीआर कार्डची मुदत संपण्यापूर्वी प्रीपेड जीपीआर कार्ड वर उपलब्ध असलेल्या संपूर्ण कर्जाचा वापर करणे आवश्यक आहे.ग्राहक वैधता कालावधीच्या आत प्रीपेड जीपीआर कार्ड वर उपलब्ध असलेल्या शिल्लक रकमेचा उपयोग करत नसल्यास,

त्या रकमेच्या परताव्या करिता किंवा ती रक्कम ग्राहकाच्या येस बँकेच्या खात्यावर किंवा अन्य बँकेच्या खात्यावर हस्तांतरण करण्यासाठी येस बँकेकडे जाऊ शकतो.ग्राहकाने एका विशिष्ट कालावधीत येस बँकेशी संपर्क साधला नाही तर, प्रीपेड जीपीआर कार्ड वर उपलब्ध असलेली थकबाकीत शिल्लक नियामक मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याकरिता एका फंडात हस्तांतरित केली जाईल.

# ४. कार्डचा उपयोग व जारी करणे

अ) ग्राहक येस बँकेला बिनशर्तपणे आणि अपरिवर्तनीयपणे प्रीपेड जीपीआर कार्ड पोहोचवणे व सुपूर्त करण्यासाठी अधिकृत करतात किंवा तत्सम एजन्सीला ग्राहकांना ही कार्ड वितरीत करण्यासाठी अधिकृत करतात.येस बँक तत्सम एजन्सीची ग्राहकास प्रीपेड जीपीआर कार्ड वितरीत करण्याच्या संबंधातील एखादी कृती किंवा वगळणेसाठी उत्तरदायी किंवा जबाबदार असणार नाही.

बी) येस बँक आणि व्यापारी आस्थापना ग्राहकास कोणतीही पूर्व सूचना न देता, कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही वेळी प्रीपेड जीपीआर कार्ड स्वीकृती नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.

सी) प्रीपेड जीपीआर कार्ड फक्त प्रामाणिक, वैयक्तिक किंवा अधिकृत उद्देशांसाठी वापरले जाईल. हे स्पष्टीकरण दिले जाते की, काही व्यापारी आस्थापनांच्या बाबतीत, अशा प्रकारच्या शुल्कांमध्ये त्यांनी प्रदान केलेल्या काही अतिरिक्त सेवा किंवा अन्य सुविधा पुरविण्यासाठीचा शुल्क समाविष्ट आहे.

ड) ग्राहक, व्यापारी प्रतिष्ठान येथे त्यांनी केलेल्या प्रत्येक व्यवहारासाठी सर्व शुल्क पत्रीवर स्वाक्षरी करून ठेवेल. येस बँक ग्राहकांना या शुल्क किंवा व्यवहाराच्या पत्रीची प्रत प्रदान करण्यासाठी बांधील नाही. ग्राहकाद्वारे केली गेलेली अशी कोणतीही विनंती मान्य करायची कि नाही हे पूर्णपणे येस बँकेच्या अखत्यारीत असेल, जर अशी विनंती ग्राहकाने व्यवहार केल्यापासून ४५ दिवसांच्या आत केली असेल तरच. ग्राहक यास सहमत आहे की शुल्क किंवा व्यवहार पत्रींची प्रत ग्राहकांना प्रदान करण्यासाठीचा अतिरिक्त खर्च किंवा शुल्क आकारण्याचा अधिकार येस बँकेस आहे.

ई) कोणत्याही व्यवहाराच्या संबंधात व्यापारी आस्थापने द्वारे आकारण्यात येणारे कोणतेही शुल्क किंवा खर्च ग्राहक त्या व्यापारी आस्थापनेबरोबर मिटवून घेईल. प्रमुख व्यापाऱ्याने ग्राहकाबरोबरच्या व्यवहारापोटी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या केलेली कुठलीही कृती किंवा वगळणे किंवा शुल्क किंवा आकार लावला असेल तर त्यासाठी येस बँक जबाबदार असणार नाही.

एफ) कोणत्याही व्यापारी आस्थापने कडून झालेली उपकरण त्रुटी किंवा कम्युनिकेशन लिंकवर स्वत: प्रक्रिया केली जाईल आणि येस बँकेच्या पडताळणी नंतरच बँकेचे लागू होणारे नियम, नियमन आणि अंतर्गत धोरणाच्या अनुषंगाने ती रक्कम कार्ड खात्यामध्ये जमा केली जाईल. ग्राहक याच्याशी सहमत आहे की कुठलाही व्यवहार बँकेकडून विचाराधीन असलेली वादाची रक्कम सोडता ग्राहकाच्या कार्ड खात्यामध्ये जमा असलेली शिल्लक पाहूनच मान्य केला जाईल. कार्ड खात्यातील अपर्याप्त निधीचा परिणाम म्हणून, ग्राहकास देय सुचनांचा अवमान केल्याच्या कारणास्तव येस बँकेला झालेल्या कोणत्याही हानी किंवा नुकसानासाठी ग्राहक येस बँकेला बिनशर्तपणे नुकसान भरपाई अदा करेल.ग्राहक यास सहमत आहे की त्याच्या येस बँक कार्ड खात्यातून येस बँकेचे झालेले थेट नुकसान किंवा तोट्याची रक्कम वजावट करण्याचा अधिकार येस बँकेला राहील.

जी) ग्राहक मान्य करतात की ग्राहकाने इतर कोणत्याही देयक साधनाने केलेले व्यवहार जर अयशस्वी, परत केले गेलेले, नाकारलेले किंवा रद्द झाल्यास सर्व परतावा त्याच्या प्रीपेड जीपीआर कार्ड मध्ये जमा केला जाऊ शकत नाहीत.

एच) कार्ड सदस्य प्रीपेड जीपीआर कार्डशी संबंधित सर्व व्यवहारांच्या संबंधात प्रत्येक वेळी सद्भावनेने कार्य करतात. ग्राहक निहित अटी आणि नियमांच्या उल्लंघना बद्दल प्रीपेड जीपीआर कार्डच्या कोणत्याही बेकायदेशीर किंवा चुकीच्या वापराची पूर्ण जबाबदारी स्वीकारतो आणि,ग्राहक यांस सहमत आहे की ग्राहकाने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या, कोणत्याही अटी व शर्तींचे

उल्लंघन केल्याच्या परिणामी येस बँकेचे शक्य नुकसान,हानी,व्याज,रूपांतरण किंवा इतर आर्थिक शुल्क येस बँकेला द्यावे लागल्यास ग्राहक बँकेला त्याची नुकसानभरपाई करेल.

आय) ग्राहक यास सहमत आहे की तो / ती लागू कायद्यांतर्गत बेकायदेशीर असलेल्या कोणत्याही वस्तू व सेवांची देय देण्यासाठी प्रीपेड जीपीआर कार्ड वापरणार नाही. प्रीपेड जीपीआर कार्डचा वापर प्रतिबंधित उत्पाद किंवा सेवा खरेदी करण्यासाठी केला जाऊ शकत नाही, उदा. लॉटरी तिकिटे, बंदी घातलेली किंवा निषिद्ध मासिके, जुगारातील सहभाग, बिटकॉइन्सची खरेदी, कॉलबॅक सेवेसाठी देय इ.

जे) ग्राहक याद्वारे स्वीकार आणि मान्य करतो की प्रीपेड जीपीआर कार्ड पुन्हा लोड केले जाऊ शकत नाही.

के) ग्राहक याद्वारे स्वीकार आणि मान्य करतो की जर प्रीपेड जीपीआर कार्डच्या एका (१) वर्षाच्या सलग कालावधीमध्ये कोणतेही व्यवहार झाले नसल्यास, प्रीपेड गिफ्ट कार्डचा मुदत काळ संपल्यावर येस बँकेकडून ग्राहकाला नोटीस पाठविल्यानंतर त्याचे प्रीपेड जीपीआर कार्ड निष्क्रिय केले जाईल. प्रीपेड जीपीआर कार्ड केवळ येस बँकेद्वारे वेळोवेळी निर्धारित केलेल्या मान्यतेनंतर आणि योग्य त्या योग्यतेनंतर, पुन्हा सक्रिय केले जाऊ शकते.

एल) ग्राहक प्रीपेड जीपीआर कार्ड वापरून केलेले सर्व व्यवहारांसाठी एसएमएस प्राप्त करण्याची किंवा येस बँके कडून ई मेल सावध सूचना प्राप्त करण्यास सहमती देतो.येस बँकेने वेळोवेळी निर्धारित केल्या प्रमाणे येस बँके कडून एसएमएस किंवा ई-मेलिंग द्वारे सावध सूचना खात्यातील जमा आणि खर्चाचे व्यवहार, प्रीपेड जीपीआर कार्ड वरील उर्वरित शिल्लक किंवा इतर तत्सम माहिती दाखवतील.

एम) ग्राहक यास सहमत आहे आणि पुष्टी करतो की ग्राहकाने कोणत्याही नातेवाईक किंवा कौटुंबिक सदस्यांना किंवा तृतीय पक्षाकडे वैयक्तिक ओळख क्रमांक ("पिन") कोणत्याही परिस्थितीत उघड करू नये. ग्राहकाचा त्याच्या वैयक्तिक ओळख क्रमांकाचा ("पिन") बेजबाबदार खुलासा आणि / किंवा प्रीपेड जीपीआर कार्डच्या अनधिकृत वापरामुळे उद्भवणारया परिणामांची जबाबदारी व उत्तरदायीत्व ग्राहकाचे असेल. प्रीपेड जीपीआर कार्डच्या अनधिकृत आणि चुकीच्या वापरामुळे येस बँकेचे झालेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हानी किंवा नुकसान यांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व ग्राहक नाकारतो.जर ग्राहक पिन विसरला किंवा हरवला तर ग्राहकाने ताबडतोब  एक अर्ज लिखित स्वरुपात करावा किंवा नवीन पिनसाठी ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क करावा.नवीन पिन ग्राहकांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठविला जाईल, जो येस बँकेकडे प्रदान किंवा उपलब्ध असेल.

एन) ग्राहक यास सहमत आहे की येस बँकेने आपल्या अखत्यारिनुसार त्याच्या सेवांशी संबंधीत बाह्य सेवा प्रदात्याच्या / एजंटच्या / आणि अशा अटींवर जरूर त्या किंवा आवश्यक असलेल्या सेवांचा उपयोग केला पाहिजे.

ओ) ग्राहकांना येस बँकेच्या संकेतस्थळावर त्यांनी वेळोवेळी अपलोड केलेल्या “वारंवार विचारले जाणारे प्रश्न” ("एफएक्यू") यांच्याकडे प्रवेश असेल.

# ५. उल्लंघन

अ) ग्राहकाद्वारे या नियम व अटींचे उल्लंघन झाल्यास, येस बँकेला प्रीपेड जीपीआर कार्ड ताबडतोब रद्द किंवा बंद करण्याचा एकमेव अधिकार बँकेवर कुठलेही पुढील दावे, मागणी किंवा वाद न करता असेल.

ब) ग्राहक यास सहमत आहे की त्यांच्याकडून जर येथे असलेल्या अटी आणि नियमांचा भंग झाला आणि त्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे बँकेला तोटा,हानी,दावे,दंड,शुल्क,आकार किंवा खर्च (कायदेशीर वकील शुल्कांसह) करावा लागला तर त्यांच्या कडून येस बँकेला नुकसान भरपाई देण्यात येईल.

## ६. अटी व मुदत

(ए) प्रीपेड जीपीआर कार्ड प्रिंटिंगच्या तारखेपासून एक (१) वर्षाच्या कालावधीसाठी किंवा प्रीपेड जीपीआर कार्डच्या दर्शनी मुदतीपर्यंत वैध असेल.

(ब) ग्राहक प्रीपेड जीपीआर कार्डची मुदत संपल्यावर कोणत्याही तृतीय पक्षाकडून त्याचा वापर टाळण्यासाठी ते कार्ड नष्ट करण्याचे मान्य करतो आणि त्यासाठी वचनबद्ध असेल.

(सी) ग्राहक कोणत्याही वेळी, तीस (३०) दिवस अगोदर लिखित नोटीस देऊन प्रीपेड जीपीआर कार्ड रद्द करण्याची विनंती करू शकतो, ग्राहकाच्या  हॉट लिस्टींगच्या विनंतीनुसार किंवा प्रीपेड गिफ्ट कार्ड अवरोधित करण्यासाठी प्रीपेड जीपीआर कार्ड रद्द केले जाईल आणि / किंवा तत्काळ प्रभावाखाली बंद केले जाईल.

डी) ग्राहकाला हे समजले आहे की, जोपर्यंत प्रीपेड जीपीआर कार्ड उजवीकडील कोपरयात कापून होलोग्राम आणि चुंबकीय पट्टी दोन्ही कापली जाऊन ते विद्रूप करून नष्ट केले किंवा येस बँकेला मिळाले नाही तोपर्यंत अशा प्रकारची नोटीस अमलात येणार नाही. ग्राहक यास सहमत आहे की ग्राहकाला प्रीपेड जीपीआर कार्ड मुदत समाप्तीपूर्वी ग्राहकाने प्रीपेड जीपीआर कार्ड नष्ट केले किंवा करण्याचा दावा असला तरी प्रीपेड जीपीआर कार्ड वर घेतलेल्या कोणत्याही शुल्कासाठी त्याला सदैव जबाबदार रहावे लागेल.

(ई) येस बँक आपल्या पूर्ण अखत्यारीमध्ये प्रीपेड जीपीआर कार्ड रद्द करू शकते.

(i) जर ग्राहकाने दिवाळखोरी घोषित केली किंवा ग्राहकाचा मृत्यू झाल्यास.

(ii) ग्राहक नियम,अटी आणि मर्यादा किंवा "अटी आणि नियम" यांच्या अंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्यांचे उल्लंघन करत असल्यास.

(iii) भारतातील कोणत्याही नियामक किंवा वैधानिक अधिका-याने किंवा कोणत्याही चौकशी एजन्सीद्वारे जारी करण्यात आलेल्या सक्षम न्यायालयाच्या किंवा आदेशाच्या आदेशानुसार ग्राहकावर कोणत्याही प्रकारचे बंधन लादले असल्यास.

(iv) प्रीपेड जीपीआर कार्ड प्रोग्राम लागू कायदे, नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांनुसार किंवा परिपत्रकानुसार बेकायदेशीर होत असल्यास.

(v) एखाद्या वेळी संपूर्ण प्रीपेड जीपीआर कार्ड प्रोग्राम रद्द बातल केला गेला तर.

(एफ) येस बँक आपल्या पूर्ण अखत्यारीमध्ये प्रीपेड गिफ्ट कार्ड वरील विशेषाधिकार तात्पुरते किंवा कायमस्वरूपी परत घेण्याचा किंवा रद्द करण्याचे अधिकार कुठलीही पूर्व सूचना न देता किंवा कारण न दाखवता राखून ठेवते.जर हे विशेषाधिकार तात्पुरते परत घेतले गेले तर हे विशेषाधिकार येस बँक आपल्या पूर्ण अखत्यारीमध्ये पूर्वपदावर आणेल. हे विशेषाधिकार कायमस्वरूपी

परत घेण्याचे असल्यास प्रीपेड गिफ्ट कार्ड कायमस्वरूपी रद्द करण्याचा अधिकार येस बँकेस असेल.तथापि, हे अत्यंत स्पष्ट केले जाते की हे विशेषाधिकार (तात्पुरते किंवा कायमचे) काढून टाकणे म्हणजे प्रीपेड गिफ्ट कार्डशी संलग्न सर्व फायदे, विशेषाधिकार आणि सेवा आपोआप काढण्यासारखे असेल.ग्राहक यास सहमत आहे की प्रीपेड गिफ्ट कार्डाच्या तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी रद्द करण्याच्या प्रसंगी, रद्द होईपर्यंत ग्राहकाला प्रीपेड गिफ्ट कार्डावरचे सर्व शुल्क, इतर लागू शुल्कांसकट भरत राहणे आवश्यक राहील, जोपर्यंत येस बँक काही निर्देश देत नाही.

(जी) जर येस बँक तात्पुरती किंवा कायमस्वरुपी, विशेषाधिकार मागे घेते किंवा प्रीपेड गिफ्ट कार्ड बंद करते, तर येस बँक सर्वोत्तम प्रयत्न आधारांद्वारे तसे ग्राहकांना लगेच सूचित करेल. अशी अधिसूचना मिळण्यास कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास येस बँक त्याला जबाबदार राहणार नाही.

(एच) ग्राहकांकडून लेखी विनंती प्राप्त झाल्या वर वरती उल्लेख केल्या प्रमाणे जर प्रीपेड गिफ्ट कार्ड बंद झाले तर ग्राहकाच्या कार्ड खात्यावर जर काही रक्कम शिल्लक असेल तर ती ग्राहकाला त्याच्या नावे पे ऑर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट काढून लागू होणाऱ्या शुल्कासहित परत करण्यात येईल. ग्राहकाने येस बँकेला उर्वरित जमा रक्कम परत मिळण्यासाठी विनंती करावी.

## ७. नोटीस

येस बँकेने दिलेली नोटीस, दिलेल्या तारखेपासून सात (७) दिवसांत किंवा येस बँकेने ग्राहकाला त्याच्या नोंदणीकृत ई-मेल किंवा मेलिंग पत्त्यावर किंवा बँकेकडे उपलब्ध असलेल्या ईमेलद्वारे पाठवलेली ई मेल ग्राहकाने प्राप्त केली आहे असे मानले जाईल.

ग्राहकाने दिलेली कोणतीही नोटीस, ही बँकेचे कॉर्पोरेट कार्यालय, पत्ता - 22 व्या मजल्यावर, इंडियाबुल्स फायनान्शियल सेंटर, सेनापती बापट मार्ग, एल्फिन्स्टन (डब्ल्यू) येथे अशी नोटीस बँकेला मिळाल्याची पोच पावती असल्यासच केवळ येस बँकेने प्राप्त केली आहे असे मानले जाईल.

ग्राहकाकडून आलेली कोणतीही नोटीस किंवा दळणवळण हे येस बँकेवर बंधनकारक असणार नाही जोपर्यंत ते लिखित स्वरूपात नसेल आणि येस बँकेकडून त्याची पोच पावती नोंदणीकृत पोस्ट ऑफिस मधून झाली नसल्यास.

## ८. शुल्क

ए) शुल्क खालील प्रमाणे असेल:

(ए) प्रीपेड जीपीआर कार्डच्या संदर्भात येस बँकेने जे शुल्क आकारले आहे, त्यात बदल करणे, नूतनीकरण, हाताळणी आणि अन्य फी चा समावेश आहे. हे शुल्क परतावा न होणारे, विना-हस्तांतरणीय आणि अनिर्दिष्ट स्वरूपाचे आहे.

(बी) विशिष्ट प्रकारच्या व्यवहारांवर सेवा शुल्क. अशा शुल्काच्या आकारणीची पद्धत येस बँकेद्वारे वेळोवेळी त्यांच्या www.yesbank.in या संकेत स्थळावर अधिसूचित करण्यात येईल.

ब) स्पष्ट त्रुटीच्या अनुपस्थितीत सर्व शुल्क ग्राहकांवर अंतिम आणि बंधनकारक राहील आणि समाविष्टीत स्वरूपाचे असेल.

सी) सर्व वैधानिक कर, वस्तू आणि सेवा कर, इतर सर्व जकाती,शुल्क (प्रीपेड गिफ्ट कार्डशी संबंधित मुद्रांक शुल्क आणि संबंधित नोंदणी शुल्क ), आणि शासनाने किंवा इतर अधिकाऱ्यांनी प्रीपेड गिफ्ट कार्डशी संबंधित वेळोवेळी लावलेले कर यांचा भार ग्राहकाला सहन करावा लागेल.

## ९. रोख रक्कम काढणे

ए) नियामक मार्गदर्शक सूचनांनुसार, रोख पैसे काढण्यास परवानगी नाही.

## १०. हरवलेले, पळवलेले, किंवा गैरवापर झालेले प्रीपेड जीपीआर कार्ड

ए) जर प्रीपेड जीपीआर कार्ड हरविले किंवा चोरीला गेले असेल तर ग्राहकाने अशाप्रकारच्या नुकसानीचा / चोरीचा तपशील ताबडतोब ग्राहक सेवा केंद्राकडे कळवावा आणि त्यांना प्रीपेड जीपीआर कार्ड तात्काळ स्थगित करण्याची विनंती केली पाहिजे.

बी) ग्राहक हे मान्य करतो की एकदा त्यांचे प्रीपेड जीपीआर कार्ड हरवले, चोरी किंवा नुकसान झाले तर ते प्रीपेड जीपीआर कार्ड जरी नंतर सापडले तरीही पुन्हा वापरता येणार नाही.

ग्राहक प्रीपेड जीपीआर कार्डच्या सुरक्षेसाठी जबाबदार असतो आणि प्रीपेड जीपीआर कार्डचा गैरवापर केला जात नाही हे सुनिश्चित करण्यासाठी त्याने सर्व आवश्यक पावले उचलली पाहिजेत. येस बँकेला जर असे लक्षात आले किंवा त्यांना माहिती झाले की ग्राहकाच्या दुर्लक्षामुळे किंवा वरील खबरदारी न घेतल्यामुळे किंवा जबाबदारी नाकारल्यामुळे ग्राहकाकडून प्रीपेड जीपीआर कार्ड हरवले, चोरी किंवा नुकसान झाले तर ते प्रीपेड जीपीआर कार्ड रद्द किंवा निरस्त करण्याचे अधिकार येस बँकेला आहेत.

सी) ग्राहकाचे प्रीपेड जीपीआर कार्ड हरवले, चोरी किंवा नुकसान झाल्याची नोंद झाल्यानंतर त्या प्रीपेड जीपीआर कार्ड वर केल्या गेलेल्या कोणत्याही अनधिकृत व्यवहारांसाठी ग्राहकाचे  कोणतेही उत्तरदायित्व स्वीकारले जाणार नाही. प्रीपेड जीपीआर कार्ड वर जमा झालेली सर्व उत्तरदायित्व, ग्राहकाने अहवाल पेश केल्यानंतर येस बँक भरेल.तथापि, प्रीपेड जीपीआर कार्ड सादर केलेल्या अहवालाच्या वेळेशी संबंधित कोणताही वाद / किंवा प्रीपेड जीपीआर कार्ड वर केले गेलेले व्यवहार, प्रीपेड जीपीआर कार्ड हरवले, चोरी किंवा नुकसान झाल्या नंतर सादर केलेला अहवाल या सर्व बाबतीत येस बँकेचे निर्णय अंतिम व ग्राहकास बंधनकारक असतील.

## ११. उत्तरदायित्व वगळणे

अ) पूर्वगामीच्या पूर्वग्रहाविना, येस बँक ग्राहकाचे किंवा तृतीय पार्टीचे उत्तरदायित्व व जबाबदारी, काही तोटा किंवा नुकसान झाल्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे खालील परिस्थितींमधून स्वीकारीत नाही:

१. पुरविलेल्या कोणत्याही वस्तू किंवा सेवांमध्ये कोणताही दोष.

२. गुणवत्ता, मूल्य हमी, पोहोचवण्यात विलंब, वस्तू न पोहोचवणे किंवा न मिळणे यासंबंधित कोणतेही वाद.

३. कोणत्याही व्यक्तीने प्रीपेड जीपीआर कार्डचा सन्मान करणे किंवा स्वीकारण्यास नकार देणे.

४. कोणत्याही कारणास्तव, प्रीपेड जीपीआर कार्ड योग्यरित्या कार्य करीत नाही किंवा एटीएम कोणत्याही कारणास्तव, योग्यरित्या कार्य करीत नाही.

५. कोणत्याही संगणक टर्मिनलमधील बिघाड.

६. कोणतीही नैसर्गिक आपत्ती.

७. प्रीपेड जीपीआर कार्डचे कोणत्याही तृतीय पक्षाकडे हस्तांतरण.

८. ग्राहकाद्वारे प्रीपेड जीपीआर कार्ड बंद करणे.

९. येस बँकेद्वारे प्रीपेड गिफ्ट कार्डच्या पुन: मालकीमुळे उद्भवलेल्या तक्रारीमध्ये ग्राहकाला झालेला तोटा किंवा नुकसान.

१०. ग्राहकाकडून या संदर्भात सूचना मिळाल्यानंतर प्रीपेड गिफ्ट कार्डला नेमून दिलेल्या रकमेतील कोणत्याही प्रकारची विसंगती.

११. ग्राहकाच्या विनंतीवरून प्रीपेड जीपीआर कार्ड वर केलेले कोणतेही उलट कार्य.

## १२. विवादास्पद व्यवहार

ए) देयकासाठी येस बँकेला प्राप्त झालेले कोणतेही शुल्क किंवा व्यवहाराची पत्री किंवा देयकाकरीताची विनंती अशा शुल्काचा समाविष्टीत पुरावा असेल, जोपर्यंत प्रीपेड जीपीआर कार्ड हरवले,चोरी झाले किंवा फसवणुकीच्या हेतूने त्याचा गैरवापर झाला आणि ग्राहकाने तशी पुष्टी केली असल्यास.

बी) ग्राहकाने प्रीपेड जीपीआर कार्ड संबंधित सर्व विवादास्पद व्यवहारांच्या तक्रारीची कल्पना येस बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राला विवादास्पद व्यवहार झाल्याच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे. ग्राहक हे मान्य करतात की विवादित व्यवहाराच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत जर असे केले गेले नाही तर येस बँक त्या तक्रारीची विनंती मान्य करणार नाही.

## १३. माल आणि सेवेची गुणवत्ता

ए) खरेदी केलेल्या कोणत्याही वस्तू किंवा सेवा संबंधी कोणताही विवाद किंवा तक्रार असल्यास त्याचे निराकरण ग्राहकाने थेट त्या व्यापारी आस्थापने बरोबर निकालात काढला पाहिजे.

## १४. प्रगटीकरण

ए) ग्राहक हे स्वीकार आणि मान्य करतो की ग्राहक व त्याचे प्रीपेड जीपीआर कार्ड संबंधितची माहिती इतर बँका, आर्थिक किंवा वैधानिक किंवा नियामक अधिकारयांसह वाटली जाईल.

बी) ग्राहक हे स्वीकार आणि मान्य करतो की येस बँक ग्राहकांच्या गुन्ह्यांबद्दल आणि / किंवा प्रीपेड जीपीआर कार्डच्या वापराबद्दलची माहीतीचा अहवाल इतर बँका, आर्थिक किंवा वैधानिक किंवा नियामक अधिकारयांना देऊ शकते.अशा बँका किंवा

आर्थिक किंवा वैधानिक किंवा नियामक अधिकारयांचा तपशील प्रगटीकरण याच्या विस्तारासकट ग्राहकांना उघड करणे येस बँकेला बंधनकारक नाही.

सी) ग्राहक येस बँकेला आणि तिच्या एजंटांना ग्राहकांच्या तपशीलांशी संबंधित सर्व माहिती आणि त्याचा देयक इतिहास यांच्या माहितीची देवाणघेवाण, वाटणी किंवा भाग बँकेच्या समूह कंपन्या किंवा संलग्न कंपन्यांना देण्याचे अधिकार देतो.

## १५. नियमन कायदा आणि कार्यक्षेत्र

ए) या अटी आणि नियमांच्या संबंधात उद्भवणारी सर्व विवादांची अंमलबजावणी भारत सरकारच्या कायद्यांनुसार करण्यात येईल आणि मुंबई न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात केली जाईल.

## १६. अटी व नियम बदलणे

प्रीपेड जीपीआर कार्डवर मिळणारे फायदे आणि वैशिष्ट्ये बदलण्याचे पूर्ण हक्क येस बँके राखून ठेवते,यात व्याज आकारणी किंवा दर आणि गणना पद्धतींचा समावेश असेल पण त्यापुरतीच मर्यादितता नसेल.

अ) येस बँक त्यांच्या सुधारणा केलेल्या अटी व नियमांना त्यांच्या www.Yesbank.in या संकेतस्थळावर होस्टिंग करून किंवा त्यांनी ठरवलेल्या कोणत्याही अन्य प्रकारे कळवील.

ब) ग्राहक या अटी व शर्तींचे पुनरावलोकन करण्यासाठी जबाबदार असेल, ज्यामध्ये बँकेच्या वेबसाइटवर सुधारणांसह त्या येस बँकेच्या संकेतस्थळावर www.yesbank.in पोस्ट केल्या जाऊ शकतात आणि ग्राहकाने कार्डचा वापर चालू ठेवून सुधारणा केलेल्या अटी आणि नियम स्वीकारले आहेत असे मानले जाईल.

## १७. शुल्क अनुसूची

तथापि प्रीपेड जीपीआर कार्ड वर केल्या जाणाऱ्या कोणत्याही व्यवहारावर येस बँकेला लागू असलेल्या कायद्यांनुसार कर वजावट स्त्रोतातून कर वजा करण्यास इथे उल्लेख केलेले काहीही अटकाव करू शकत नाही

## १८. ग्राहक तक्रार निवारण

ए) प्रीपेड जीपीआर कार्ड आणि / किंवा या अटी व नियमांशी संबंधित कोणताही विवाद किंवा तक्रारी असल्यास, ग्राहक येस बँकेच्या ग्राहक सेवा क्रमांक 1800 3000 1113 यावर फोन करून किंवा unimoni.support@yesbank.in या ईमेलवर संपर्क साधू शकतात.

बी) प्रीपेड जीपीआर कार्ड आणि / किंवा या अटी व नियमांशी संबंधित विवादाचा किंवा तक्रारीचे पर्याप्त निराकरण किंवा तोडगा बँकेच्या ग्राहक सेवा केंद्रा द्वारे निघत नसल्यास ग्राहक, येस बँकेच्या नोडल ऑफिसर ज्यांचा तपशील बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे त्यांच्याशी संपर्क साधू शकतात.

सी) येस बँक यास सहमत आहे की ग्राहकाने केलेल्या तक्रारी, विवाद किंवा दुखणी यांचे निराकरण येस बँके तर्फे कालबद्ध रीतीने केले जाईल.

डी) ग्राहक त्यांच्या तक्रार निवारणासाठी कोणत्याही वेळी बँकिंग लोकपालाशी संपर्क साधू शकतात.

'आकारणीचे वेळापत्रक':

| शुल्क | रक्कम |
|---|---|
| कार्ड जारी करणे | ५० |
| कार्ड बदली करणे | ५० |

जीपीआर प्रीपेड कार्डद्वारे केल्या जाणाऱ्या कोणत्याही व्यवहारासाठी लागू असणाऱ्या कायद्यानुसार आवश्यक टीडीएस कापण्यासाठी येथे देण्यात आलेल्या मजकुरामध्ये येस बँकेला प्रतिबंध करण्यासारखे काहीही नाही.